नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २६४ Issue - 264 | वार शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ Blow- Friday Date 13 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जय शिवराय... युनोस्कोकडून महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र मिळालं

## मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी स्वीकारले प्रमाणपत्र; युनेस्को मुख्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्लयांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले.

यूनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास मंत्री ॲड. शेलार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी, यूनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्लयांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले.



छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्लयांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो.

रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्लयांचा समूह जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२५ मध्ये मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तिवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना आज ऊर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले आहेत. भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांनीही परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही तमाम महाराष्ट्रातर्फे मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले. तसेच हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी शिवप्रेमींसाठी गौरवाचा क्षण असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

भारत संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा युनेस्को मुख्यालयाला भेट दिला असून, २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त या पुतळ्याची स्थापना पॅरिसमध्ये युनेस्को मुख्यालयात झाली आहे. सामाजिक न्याय, समानता, बंधुता आणि शिक्षणाद्वारे सक्षमीकरण यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली शिकवण ही युनेस्कोच्या मुलभूत ध्येयाशी सुसंगत आहे. पॅरिसमधील त्यांच्या या स्मारकाला मंत्री शेलार यांनी अभिवादन केले. यावेळी विशाल शर्मा यांच्यासह विभागाचे डॉ. सचिव किरण कुलकर्णी, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक हेमंत दळवी आणि मान्यवर उपस्थित होते.

# अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ५,०१२ सहायक प्राध्यापक पद भरतीस मान्यता : मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील ५ हजार १२ रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.



भरती प्रक्रियेच्या प्रमुख अटी व शर्ती:-

विद्यार्थी संख्येवर आधारित पदे १ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही ५,०१२ पदे भरली जातील. ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असणार आहे.

नॅक मानांकन अनिवार्य

ज्या शैक्षणिक संस्थांकडे 'नॅक' मान्यता आहे, त्यांनाच नवीन पदनिर्मितीचा लाभ मिळेल. मात्र, ज्यांचे मूल्यांकन कमी आहे, त्यांना सुधारणेसाठी तीन वर्षांचा सवलतीचा कालावधी देण्याबाबत शासन स्वतंत्र धोरण आखणार आहे.

आचारसंहितेचे पालन

भरती प्रक्रियेदरम्यान राज्यात आचारसंहिता लागू असल्यास, निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सूचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदांचा सुधारित आराखडा (आकृतीबंध) निश्चित करण्यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या स्तरावर एक समिती नियुक्त केली जाणार आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध आहे.

# मंत्रालयात एसीबीची मोठी कारवाई, लाच घेताना अन्न व औषध प्रशासन विभागातील क्लार्कला अटक


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मंत्रालयात एसीबीनं मोठी कारवाई केली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागातील क्लर्कला लाच घेताना अटक करण्यात आली आहे. राजेंद्र ढेरंगे असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे. मेडिकलचा निलंबित परवाना पूर्वरत करुन देण्यासाठी मागितली ५० हजारांची लाच मागितली होती. तडजोडीअंती ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली आहे. मंत्रालयातल्या दुसऱ्या मजल्यावर ही कारवाई झाल्याने चर्चांना उधाण आले आहे. या घटनेनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

### हर्षवर्धन सपकाळ यांचा सरकारवर हल्लाबोल

मंत्रालयात अन्न व औषध प्रशासन विभागातील क्लर्कला लाच घेताना अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. मेडिकलचा निलंबित परवाना पूर्वरत करुन देण्यासाठी क्लर्कने ५० हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अटक करण्यात आली आहे.

तक्रार आल्यानंतर मंत्री नरहरी शिरवळ यांच्या कार्यालयात अँटी करप्शन ब्युरोचे सहा अधिकारी पोहोचले होते. तक्रार आल्यानंतर मंत्री नरहरी शिरवळ यांच्या कार्यालयात अँटी करप्शन ब्युरोचे सहा अधिकारी पोहोचले होते. कारवाई करताना



झिरवळ यांचं कार्यालय पूर्ण ताब्यात घेतलं. तपास झाल्यानंतर मग या संबंधित क्लर्क ला ताब्यात घेऊन गेले. त्यानंतर कार्यालय उघडण्यात आलं. महाभ्रष्ट महायुती सरकारच्या कारकिर्दीत मंत्रालयात खुलेआम लाचखोरी आणि कमिशनखोरी सुरू

दरम्यान, या घटनेवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रालयात एका कॅबिनेट मंत्र्यांच्या कार्यालयात एसीबीने सापळा रचून एका लाचखोर अधिकाऱ्याला ताब्यात घेतल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. महाभ्रष्ट महायुती सरकारच्या कारकिर्दीत मंत्रालयात खुलेआम लाचखोरी आणि कमिशनखोरी सुरू असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

जनतेची कामे पैशाशिवाय होत नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. मुख्यमंत्र्यांनी संबंधित प्रकरणाची दखल घेऊन जनतेला माहिती द्यावी आणि लाचखोर मंत्र्याला पदावरून हटवावे, भ्रष्टयुती असे म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.

**टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबतच्या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहोचविणार** — **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षांपासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देऊन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे.




नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला, नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा मोटर्सचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

टाटा ट्रस्ट्सचे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामन्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे. शासन आणि टाटा ट्रस्ट्स यांनी आज राज्याच्या एकात्मिक विकासाला पाठबळ देण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे. नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर यांनीही शासनासोबत जलसंधारण क्षेत्रात काम करण्यास मदत मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डॉ. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

कराराचा उद्देश

सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी' याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

सामंजस्य करारांची व्याप्ती

माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे; टेलिमेडिसिनसह इतर माध्यमांतून उपचार सहज देणे, शहरी आणि दुर्गम भागातील सर्वसमावेशक (पान २ वर...)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### राज्याचा सन्मान

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्स येथील कार्यालयात जाऊन स्वीकारले. दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी ११ जुलै २०२५ रोजी, यूनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पॅरिस येथे स्वीकारले. छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२५ मध्ये मंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तिवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान स्वीकारताना आज ऊर भरून आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले मार्गदर्शन आणि परिश्रम तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या योगदानाबद्दल मंत्री ॲड. शेलार यांनी आभार मानले आहेत. भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांनीही परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांचेही तमाम महाराष्ट्रातर्फे मंत्री ॲड.शेलार यांनी आभार मानले. तसेच हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी शिवप्रेमींसाठी गौरवाचा क्षण असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# पायलटने जाणीवपूर्वक विमान पाडल्याचा दावा सरकारने खोडून काढला

## अहमदाबाद विमान दुर्घटनेबाबत सरकारचं स्पष्टीकरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली :गुजरातमधील अहमदाबाद येथे गेल्या वर्षी एअर इंडियाचं विमान ख-१७१ दुर्घटनाग्रस्त झालं होतं. त्या दुर्घटनेत २६० जणांचा मृत्यू झाला होता. काही विदेशी माध्यमांनी पायलटनं जाणीवपूर्वक इंधनाचा स्वीच ऑफ केल्याचा दावा करणारं वृत्त प्रसिद्ध केलं होतं. ते वृत्त सरकारनं फेटाळलं आहे. अहमदाबाद एअर इंडिया विमान दुर्घटनेनंतर संबंधित यंत्रणांनी चौकशी सुरु केली होती. एअरक्राफ्ट एक्सीडेंट इन्वेस्टिगेशन ब्यूरोनं प्रसिद्धीपत्रक जारी करुन त्याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे.

AAIB नं जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार अहमदाबाद येथील एअर इंडियाच्या भीषण विमान दुर्घटनेची चौकशी अद्याप पूर्ण झालेली नाही. या प्रकरणी कोणताही अंतिम निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. विमान दुर्घटनेसंदर्भात अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरवणं योग्य नसल्याचं एएआयबीनं म्हटलं आहे.

खइ नं म्हटलं की काही मीडिया रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला होता की अहमदाबाद विमान दुर्घटनेची चौकशी पूर्ण झाली. मात्र, त्या बातम्या चुकीच्या असून अफवांवर आधारित आहेत. लोकांना आवाहन करण्यात येतं की या गंभीर प्रकरणात फक्त अधिकृत प्रसिद्धीपत्रक, तपासाचा अंतिम रिपोर्ट समोर येण्याची वाट पाहावी.

सर्व तथ्य तपासणार – AAIB

AAIB नं म्हटलं की अहमदाबाद विमान दुर्घटना प्रकरणाची चौकशी व्यावसायिकपणे किंवा पूर्ण पारदर्शकतेनं केली जात आहे.या प्रकरणातील सर्व तथ्य तपासली जात आहेत. सर्व गोष्टींची तपासणी केल्यानंतर अंतिम रिपोर्ट जारी केला जाईल. विमान दुर्घटनेची चौकशी ही कॉम्प्लेक्स आणि टेक्निकल प्रक्रिया आहे. यात फ्लाइट डेटा रेकॉर्डर, कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरचा रिव्यू, टेक्निकल इंस्पेक्शन, हवामानची स्थिती यासह इतर पैलूंवर सखोल पणे चौकशी केली जात आहे. यामुळं चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचणं घाईचं ठरेल, असं एएआयबीनं म्हटलं. दरम्यान, अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमान दुर्घटनेत गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांचा मृत्यू झाला होता. अहमदाबादमधील विमान दुर्घटनेबाबत अंतिम चौकशी अहवाल कधी येणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## देशात ८,७८० मेगावॅट क्षमतेचे एकूण २४ अणुऊर्जा प्रकल्प व्यावसायिकरित्या कार्यरत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सध्या, देशात ८,७८० मेगावॅट क्षमतेचे एकूण २४ अणुऊर्जा प्रकल्प (आरएपीएस-१ वगळता) व्यावसायिकरित्या कार्यरत आहेत. अणुऊर्जा अभियानात घोषित केल्याप्रमाणे, २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जा क्षमता गाठण्यासाठी सरकारने एक आराखडा तयार केला आहे. या आराखड्यानुसार, सध्या अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर असलेल्या प्रकल्पांच्या पूर्णत्वास जाणाऱ्या गतीमुळे ८.७८ गिगावॅट च्या सध्याच्या अणुऊर्जा क्षमतेवरून (आरएपीएस -१ वगळता) २०३१-३२ पर्यंत ती सुमारे २२ गिगावॅट पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. २०३२ नंतर 'एनपीसीआयएल'द्वारे आणखी ३२ गिगावॅट अणुऊर्जा क्षमता स्थापन करण्याची योजना आहे, ज्यामध्ये स्वदेशी प्रेशराइज्ड हेवी वॉटर रिॲक्टर्स (पीएचडब्ल्यूआर) आणि लाईट वॉटर रिॲक्टर्स ( एलडब्ल्यूआर) यांचा समावेश आहे, ज्यामुळे २०४७ पर्यंत ही क्षमता सुमारे ५४ गिगावॅट पोहोचेल. या आराखड्यातील, उर्वरित ४६ गिगावॅट वीज इतर सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (केंद्र आणि राज्य), राज्य सरकारे, खाजगी क्षेत्र आणि संयुक्त उपक्रमांद्वारे वेगवेगळ्या व्यवसाय प्रारुपांद्वारे उभारली जाण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये विविध तंत्रज्ञानाच्या अणुभट्ट्या समाविष्ट आहेत.

सध्या तामिळनाडूतील कल्पक्कम येथे भाविनी द्वारे ५०० मेगावॅट क्षमतेचा प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टर (पीएफबीआर) प्रकल्प सुरू होत आहे. सरकारने तामिळनाडूतील कल्पक्कम येथे २ ँ ५०० मेगावॅट क्षमतेच्या एफबीआर १ आणि २ 'ट्विन युनिट'साठी प्रकल्पपूर्व उपक्रम राबविण्यास मान्यता दिली आहे. पीएफबीआर कडून पहिला तपासणी अहवाल (क्रिटिकॅलिटी) प्राप्त झाल्यानंतर, एफबीआर १ आणि २ प्रकल्पांच्या आर्थिक मंजुरीसाठी सरकारशी संपर्क साधला जाईल. थोरियमच्या कार्यक्षम वापरासाठी आवश्यक असलेल्या तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक करण्यासाठी अणुऊर्जा विभाग एका लहान आकाराच्या क्षार वितळवणाऱ्या अणुभट्टीचा विकास करत आहे. क्षार वितळवणाऱ्या अणुभट्टीच्या प्रात्यक्षिकासाठी विशेष पदार्थांचा विकास करण्यासाठी रसायनशास्त्रातील संशोधन आणि विकास प्रगतीपथावर आहे. या प्रात्यक्षिक अणुभट्टीच्या यशस्वी ऑपरेशननंतर या अणुभट्टीच्या उच्च शक्तीच्या आवृत्तीचे व्यावसायिक रितीने काम हाती घेतले जाईल.

आंध्र प्रदेशातील वायझॅक येथे एक अणु संशोधन आणि विकास केंद्र स्थापन केले जात आहे

## स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन

(पान १ वरून...) प्राथमिक आरोग्य सेवा वाढवणे, एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवाद्वारे उत्तम आपत्कालीन प्रतिसादास पाठबळ देणे. दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखण्यास मदत करणे, किशोरवयीन कुपोषण आणि रक्तक्षय दूर करणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून 'टेक-होम रेशन' सारख्या योजनांचे वितरण मजबूत करणे, तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे, मराठवाडा आणि विदर्भासह पाणीटंचाईग्रस्त भागांवर विशेष भर देऊन मृद व जलसंधारण योजनांची अंमलबजावणी करणे, हवामान बदलांचा अभ्यास करून शेतीला प्रोत्साहन देणे, वन-आधारित आणि ग्रामीण बिगर-शेती उपजीविकेला पाठबळ देणे, आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता आणि उपजीविका या सर्वांना एकत्र आणणारा एकात्मिक ग्राम विकास साधणे. टाटा ट्रस्टच्या सोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स यांचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

## प्रभाग क्र.३ मध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय पुण्यतिथी रंजिता चाकोतेतर्फे साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहर भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा व लोकप्रिय नगरसेविका सौ.रंजितताई चाकोते यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रभाग क्रमांक ३ (क)येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,हा कार्यक्रम रेवणसिद्ध मंगल कार्यालयात पार पडला.यावेळी त्यांच्या विचारांना उजाळा देत भारतीय जनता पक्षाची पायाभरणी कशी झाली, तसेच एकात्म मानवतावाद या त्यांच्या



तत्वज्ञानाची मांडणी कशी पक्षाच्या कार्यपद्धतीत प्रतिबिंबित होते यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत धोंडे पाटील हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमास मल्लिनाथ राचेट्टी वकील, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथ वडतिले, माजी नगरसेविका इंदिराताई कुडक्याल, प्रशांत फत्तेपुरकर, जगदीश होनराव, विजय मद्दा, सकलेश चाकोते, स्वप्निल चाकोते, श्रीशैल चाकोते, सुखलाल माढेकर, बालकीसन माढेकर, युवराज सुरवसे, सतीश परेली, महेश चाकोते, तेजस साखरे, राहुल साखरे,पंडित वडतिले रुपा चडचणकर, शोभा तोरंगी, वर्षा जगदाळे, हिंगमिरे काकू, रुपा कुताटे, उज्वला काटगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रोहित बिदरी यांनी केले. ज्योतीताई वडतिले यांची बुरुड समाज महिला आघाडीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पंडित दीनदयाळ उपाध्यायजींच्या विचारांचा वारसा पुढे नेत समाजहितासाठी कार्य करण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

## एआय फॉर ॲग्री २०२६ : कृत्रिम बुद्धिमत्ता व कृषी क्षेत्रातील जागतिक शिखर परिषद महाराष्ट्रात : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकऱ्याला जागतिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर शेतीमध्ये व्हावा. 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणांतर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन' (एआय फॉर ॲग्री २०२६) ही परिषद २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ, कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था यामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे उपस्थित होते. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषी विकासाच्या प्रवासात महत्त्वाचा टप्पा मानली जाणारी एआय फॉर ॲग्री २०२६ ही जागतिक परिषद येत्या २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. एआय फॉर ॲग्री ही परिषद वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, एफएओ, युएनडीपी, आयएफएडी, वर्ल्ड बँक समूह, आशियाई विकास बँक (एडीबी), इंटरनॅशनल क्रॉप्स रिसर्च इन्सिटीट्यूट फॉर दी सेमी-ॲरिड ट्रापिक्स (आयसीआयएसएटी), भारतीय विज्ञान संस्था (आयआयएससी), एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन (एमएसएसआरएफ) जागतिक व राष्ट्रीय भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. राज्यात जाहीर करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' च्या अंमलबजावणीकडे टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. या एआय धोरणाच्या निर्मितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीतून शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची प्रेरणा मिळाली. कृषी आणि संलग्न क्षेत्रातील नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था आदींसाठी एक व्यासपीठ म्हणून परिषदेचा उपयोग करून घेता येईल, असे त्यांनी सांगितले.

महाकृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डेटा-आधारित परिसंस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाने महाकृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ जाहीर केले आहे. हे धोरण कृषी आणि संलग्न क्षेत्रांमध्ये 'एआय'चा प्रत्यक्ष शेतीमध्ये वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे. या धोरणांतर्गत महा एजीएक्स (महाराष्ट्र कृषी डेटा एक्सचेंज), एआय-सक्षम ट्रेसिबिलिटी प्रणाली, एआय आधारित भू-स्थानिक बुद्धिमत्ता इंजिन, शेतकरी-केंद्रित एआय सल्ला मंच-महाविस्तार या डिजिटल पायाभूत सुविधा विकसित केल्या जात आहेत. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक केंद्र म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रीटेक नाविन्यता केंद्र कार्यरत असून, शासनाने पहिल्या टप्प्यात रुपये ५०० कोटींच्या निधीला मान्यता दिली आहे.

एआय फॉर ॲग्री २०२६ कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित, समावेशक, हवामान-संवेदनशील आणि शेतकरी-केंद्रित कृषी परिवर्तनाला चालना देणारे हे एक प्रमुख जागतिक व्यासपीठ आहे. २२ व २३ फेब्रुवारी २०२६ रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई येथे 'एआय ॲग्री २०२६' चे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये धोरणकर्ते, आंतरराष्ट्रीय संस्था,शास्त्रज्ञ, शैक्षणिक संस्था, तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, स्टार्टअप्स, गुंतवणूकदार, शेतकरी उत्पादक संस्था तसेच शेतकरी समुदायाचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. ही परिषद डेटा-आधारित आणि तंत्रज्ञान-सक्षम कृषी परिसंस्था निर्माण करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावणार आहे. संयुक्त राष्ट्राने २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष घोषित केले आहे, त्यामुळे शेतीमध्ये महिला शेतकऱ्यांची भूमिका महत्वाची आहे. त्यांच्यासाठीही या परिषदेमध्ये माहितीपूर्ण संवादसत्र आयोजित करण्यात येणार आहेत.

विविध चर्चासत्रांचे आयोजन

एआय फॉर ॲग्रीमध्ये दोन दिवस विविध चर्चासत्रांचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये कृषी व अन्न प्रणाली परिवर्तनासाठी प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, महिला शेतकऱ्यांसाठी समावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता : सक्षमीकरण, समता आणि नेतृत्व, ॲग्री एआयसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा : डेटा, विश्वास, ट्रेसिबिलिटी आणि प्लॅटफॉर्म्स, ॲग्री एआय मधील गुंतवणूक : बाजारपेठा आणि विस्तारक्षम नवोन्मेष, जागतिक वैज्ञानिक सहकार्य आणि एआय फॉर ॲग्री संशोधन नेटवर्क, कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदार वापर, धोरणात्मक मार्ग आणि जागतिक प्रशासन याविषयांचा समावेश आहे.

कृषी क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञांचा परिषदेत सहभाग

'एआय फॉर ॲग्री' ही परिषद वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, एफएओ, युएनडीपी, आयएफएडी, वर्ल्ड बँक समूह, आशियाई विकास बँक, इंटरनॅशनल क्रॉप्स रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर दी सेमी ॲरीड ट्रापीक्स, भारतीय विज्ञान संस्था, एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन जागतिक व राष्ट्रीय भागीदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये नामांकित शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्रातील अग्रणी, स्टार्टअप्स तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सशक्त जाळे सहभागी होणार आहे. या परिषदेत इन्फोसिसचे अध्यक्ष व सह-संस्थापक तसेच युआयडीआय (आधार) चे संस्थापक अध्यक्ष नंदन निलेकणी, एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौम्या स्वामिनाथन, ण्४घीं इंडियाचे मुख्य सल्लागार जे. सत्यनारायण, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम; केंद्र व राज्य शासनातील वरिष्ठ अधिकारी, तसेच आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ सहभागी होणार असून त्यात प्रामुख्याने बहुपक्षीय संस्था, शैक्षणिक क्षेत्र, नामांकित अशासकीय संस्था, उद्योग आणि स्टार्टअप क्षेत्रातील जागतिक तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्थांसाठी फायदेशीर

एआय फॉर ॲग्री ही परिषद शेतकरी-केंद्रित परिणामांवर विशेष भर देऊन आखण्यात आली असून, तांत्रिक नवोन्मेषांचा प्रत्यक्ष लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल याची खात्री करण्याचा उद्देश आहे. या परिषदेमुळे शेतकरी व शेतकरी उत्पादक संघटनांना एआय-आधारित पीक सल्ला सेवा, हवामान-लवचिक शेती नियोजन साधने, कीड व रोगांबाबत पूर्वसूचना प्रणाली, उत्पादन अंदाज, बाजारपेठेची माहिती तसेच ट्रेसिबिलिटी-सक्षम मूल्यसाखळ्या यांवरील उपाय योजनांचा प्रत्यक्ष अनुभूती व माहिती मिळणार आहे.

कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञानावर आधारित कृषी प्रदर्शन

एआय फॉर ॲग्री २०२६ अंतर्गत ३० अग्रगण्य स्टार्टअप्सचे प्रदर्शन, तसेच उद्योग व शैक्षणिक संस्थांचा सहभाग आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनामध्ये कृषी मूल्यसाखळीतील विविध टप्प्यांवर कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या अत्याधुनिक नवोन्मेषी उपाययोजना सादर केल्या जातील. यामध्ये प्रिसिजन शेती, रिमोट सेन्सिंग व भू-स्थानिक बुद्धिमत्ता, एआय-आधारित सल्ला प्रणाली, हवामान जोखीम विषण, ट्रेसिबिलिटी, डिजिटल ॲग्री-फायनान्स तसेच बाजार संलग्नता यांसारख्या क्षेत्रांतील उपायांचा समावेश असेल.

मुख्य कार्यक्रम, उद्घाटन व राष्ट्रीय स्तरावरील समन्वय

एआय फॉर ॲग्री परिषदेमध्ये २२ व २३ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विशेष सीईओ राउंडटेबल बैठक, महाॲगएक्स-महाराष्ट्र कृषी डेटा एक्सचेंजचे उद्घाटन, एआय फॉर आरएन संशोधन नेटवर्कचा शुभारंभ, ॲग्रीटेक स्टार्टअप्ससाठी गुंतवणूक मंच, दोन दिवसीय एआय फॉर ॲग्री नवोन्मेष प्रदर्शन, भिली आदिवासी भाषेसाठी विकसित केलेल्या एलएलएमचे उद्घाटन तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण सामंजस्य करार यांचा समावेश आहे. एआय फॉर ॲग्री ही परिषद इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ ची अधिकृत सॅटेलाईट इव्हेंट म्हणून घोषित करण्यात आली असून, त्यामुळे या परिषदेमधील निष्कर्ष, शिफारसी व उपक्रमांना राष्ट्रीय पातळीवरील एआय उपक्रमांशी सुसंगती प्राप्त होणार आहे. यामुळे भारताच्या व्यापक एआय धोरणात्मक चर्चेत व नवोन्मेष परिसंस्थेत या परिषदेतून उद्भवणारे निष्कर्ष मोलाची भर घालतील.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सोलापूर जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ साठी ११४६.३४ कोटीचा आराखडा सादर

## जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२६- २७ साठी पालकमंत्री श्री. गोरे यांच्याकडून ३०० कोटीची अतिरिक्त मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपायोजना व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्र अंतर्गत ११४६.३४ कोटीची मागणी सोलापूर जिल्हा प्रशासनाने मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत अतिरिक्त ३०० कोटी तर पंढरपूर येथील आषाढी वारीत कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी विशेष बाब म्हणून ६५ कोटी निधीची तरतूद करण्याची आग्रही मागणी मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली.

पालकमंत्री श्री गोरे पुढे म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण साठी राज्य शासनाने ठरवून दिलेली आर्थिक मर्यादा ६९३.९० कोटी होती, त्यामध्ये ३०० कोटींची अतिरिक्त मागणी सह ९९३.९० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १४७ कोटी आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र ५ कोटी ४४ लाख ५४ हजार असा एकूण १ हजार १४६ कोटी ३४ लाख ५४ हजाराचा आराखडा मंजूर करावा, अशी मागणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी केली.

### पंढरपूर येथे कायमस्वरूपी सुविधा उभारण्यासाठी ६५ कोटींची मागणी

वर्षा निवासस्थानी येथे आयोजित राज्यस्तरीय नियोजन समिती बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, प्र. जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीमती प्रीतम कुंटला यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्ह्याचा आराखडा मुख्यमंत्री महोदय यांच्यासमोर सादर केला. यामध्ये सर्वसाधारण योजनेमध्ये कृषी व संलग्न सेवा ४७.८२ कोटी, ग्रामीण क्षेत्राच्या विकास योजना ६८ कोटी, जलसंधारण विभाग योजना ४८.५० कोटी, ऊर्जा विकास व अपारंपारिक ऊर्जा ६५ कोटी, शिक्षण विभाग ४० कोटी, महिला व बाल विकास




१९.७८ कोटी, आरोग्य सेवांचे बळकटीकरण ७३.४० कोटी, नगर विकासाच्या योजना ११३ कोटी, रस्ते व परिवहन ६७ कोटी, पर्यटन तीर्थक्षेत्र, गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास ४७.३ कोटी, पोलीस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण १९.७८ कोटी, क्रीडा विभाग ७ कोटी

तर अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत कृषी व संलग्न सेवा ७.२३ कोटी, ऊर्जा ४.६५ कोटी, सामाजिक व सामाजिक सेवा १२८.१७ कोटी, उद्योग व खाणकाम ३४ लाख, नाविन्यपूर्ण योजना ५.२८ कोटी, समाज कल्याण कार्यालय बळकटीकरण ७३ लाख आणि आदिवासी उपयोजना अंतर्गत ५ कोटी ४४ लाख ५४ हजाराचा निधी ठेवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

---

# आदिवासी विकास विभाग व टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स यांच्यात सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे, उद्योगसुसंगत आणि आधुनिक तंत्रज्ञानाधारित कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स (टीआयआयएस), मुंबई यांच्यात मंत्रालयात सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये २४० आदिवासी विद्यार्थ्यांना प्रगत औद्योगिक तंत्रज्ञान विषयक विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे आणि टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्सचे मुख्य वित्त अधिकारी (सीएमओ) मयंक पलन यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये प्रशिक्षण, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण आणि उद्योगमानक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना निश्चित रोजगारसंधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्समार्फत पार पाडली जाणार आहे.

सचिव विजय वाघमारे म्हणाले, आदिवासी युवांना प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक स्तरावरील प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा विभागाचा प्राधान्यक्रम आहे. टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्ससोबत करण्यात आलेला हा करार केवळ कौशल्य विकासापुरता मर्यादित नसून, आदिवासी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील रोजगारक्षमतेसाठी भक्कम व टिकाऊ पाया निर्माण करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. शासन आणि उद्योग क्षेत्राच्या संयुक्त सहभागातून आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी नव्या संधी निर्माण होऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. या करारांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल्स (ए%), रोबोटिक्स, इंडस्ट्रियल ऑटोमेशन, ३ डी प्रिंटिंग, इलेक्ट्रॉनिक्स आणि ईव्ही बॅटरी तंत्रज्ञान या प्रगत आणि भविष्योन्मुख औद्योगिक क्षेत्रांतील सात विशेष अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून आदिवासी तरुणांना आधुनिक उद्योग क्षेत्राशी सुसंगत कौशल्ये प्राप्त करून रोजगारक्षम बनविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यावेळी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या सहसंचालक चंचल पाटील, सदन अधिकारी विजय गुण्ड, नविन पृथ्वी, युएनडीपीचे प्रतिनिधी उज्ज्वल पहुरकर, उदयन मोहापात्रा व टीम, तसेच टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्सचे अधिकारी श्रेयस पाटकर, राधेश्याम उपस्थित होते. या सहकार्य कराराचे संकल्पनात्मकरण आणि सुलभीकरण यूएनडीपी प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (पीएमयू) यांच्या सहाय्याने करण्यात आले आहे.

---

# खामसवाडी येथे जगदंबा माध्यमिक विद्यालयात स्वयं शासन दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी : हनुमंत पाटुळे/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ साजरा करण्यात आला. या वेळी एक दिवसाची मुख्याध्यापक म्हणून कु.रेवती बालाजी माने हिने काम पाहिले. तर उप मुख्याध्यापक म्हणून कुमार सुरज सोमनाथ लोकरे यांनी काम पाहिले.

तसेच शाळेतील दहावीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी एक दिवसाचा गुरुजी व अध्यापनाचा अनुभव घेतला. बुधवारी दुपारी तीन वाजता त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी सर्वच विद्यार्थी दिवसभर आनंदी होते तर शेवटी कार्यक्रमाच्या शेवटी भावनाविवश झाले होते. या वेळी मनोगत व्यक्त करताना अनेक विद्यार्थ्यांना अश्रू अनावर झाले होते.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सावंत मॅडम,श्री गरजे सर, श्री डिकले सर,शिंदे सर, केंद्रे सर, श्री पाटील सर, व सेवक श्री जमादार बी. व्ही. यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी श्री अजित शेळके यांनी आभार मानले.




---

# शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात 'एआयएफ' संस्था महाराष्ट्र शासनासोबत काम करण्यास उत्सुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांत परिवर्तनासह कौशल्य विकासासाठी 'अमेरिकन इंडिया फाऊंडेशन' (एआयएफ) आणि महाराष्ट्र शासन संयुक्तपणे काम करणार आहे. 'एआयएफ'चे संचालक कामेश संघी यांनी नुकतीच महाराष्ट्र राज्याचे नवी दिल्लीतील निवासी गुंतवणूक आयुक्त सुशील गायकवाड यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.



गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेली अमेरिकन इंडिया फाऊंडेशन ही संस्था शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार महाराष्ट्रात विविध प्रकल्प राबवण्यास उत्सुक आहे. या भागीदारीमुळे विशेषत: ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य सुविधांना नवी गती मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच कौशल्य विकासासाठीही विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. एआयएफने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक प्राधान्य क्रमांनुसार संयुक्तपणे काम करण्याची तयारी दर्शविली आहे. महाराष्ट्रातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करणे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी कौशल्य विकास प्रकल्प राबवणे यावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

गेल्या अडीच दशकांपासून भारतातील विविध राज्यांमध्ये कार्य करण्याचा अनुभव 'एआयएफ'कडे आहे. या अनुभवाचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महाराष्ट्रात शाश्वत विकासाचे मॉडेल उभे करण्याबाबत गुंतवणूक आयुक्त गायकवाड यांनी यावेळी चर्चा केली.

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सामाजिक उत्तरदायित्व आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे सहकार्य मोलाचे ठरते. शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांत 'एआयएफ' सोबत काम केल्यास तळागाळातील घटकांपर्यंत सरकारी योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे पोहोचवता येईल असा विश्वासही निवासी गुंतवणूक आयुक्त गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केला.

अमेरिकन इंडिया फाऊंडेशनचे संचालक संघी यांनी यावेळी संस्थेच्या गेल्या २५ वर्षांतील कार्याचा आढावा सादर केला आणि महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी आवश्यक ते सर्व तांत्रिक सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

---

**पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर**

**उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची माहिती**

# स्थलांतरित उसतोड कामगारांच्या मुलांसाठी ११ शासकीय वसतिगृहांच्या बांधकामासाठी १५९ कोटींचा निधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवान बाबा शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील ११ वसतिगृहांच्या बांधकामासाठी १५९ कोटी ३६ लाख ६० हजार इतक्या रकमेच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

ऊसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाबाबतची आस्था वाढीस लावून त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर करण्यासाठी स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या ४१ तालुक्यांच्या ठिकाणी मुलांसाठी ४१ व मुलीसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमता) शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात मुलांसाठी १० व मुलींसाठी १० अशी एकूण २० शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत मान्यता देण्यात आलेल्या ८२ शासकीय वसतिगृहापैकी



पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात आलेली २० शासकीय वसतिगृहे वगळता उर्वरित ६२ शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात दोन (मुलांचे १ व मुलीचे १) प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमता) अशी एकूण २२ शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णयाद्वारे यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींनी शिकले पाहिजे, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले पाहिजे असे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वप्न होते. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले आणि या मुला- मुलींसाठी वसतिगृह बांधण्यासाठी पाठपुरावा केला आणि ते पालकमंत्री असताना अनेक ठिकाणी जागाही निश्चित करण्यात आल्या होत्या. सारथी संस्थेच्यावतीने मराठा समाजातील मुलांसाठी विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहांच्या धर्तीवर बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृहांचे दर्जेदार बांधकाम करावे, अशा सूचना दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांना वेळेवेळी दिल्या होत्या,अशी माहितीही उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

ही सर्व शासकीय वसतिगृहे शासकीय इमारतीत सुरु करावयाची आहेत. सद्यस्थितीत केवळ तीन ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध झाली असून त्या ठिकाणी वसतिगृहाचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. उर्वरीत १९ वसतिगृहांपैकी ११ जागा उपलब्ध असलेल्या वसतिगृहांच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागातर्फे जारी करण्यात आला आहे. यामध्ये पाटोदा, केज, परळी, गेवराई, माजलगाव येथे प्रत्येकी दोन (मुलांसाठी १ व मुलींसाठी १) आणि बीड येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहाचा समावेश आहे.

---

# नोंदणी व मुद्रांक विभागात 'गट-ड' संवर्गातील उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरतीकरिता आय. बी. पी. एस. कंपनीमार्फत जुलै-२०२५ मध्ये ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनाकरीता बोलाविण्यात येणार आहे. याबाबत विभागाच्या https://igrmaharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर स्थळ व दिनांक लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी कळविले आहे. नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गासाठीच्या परीक्षेचा निकाल दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला होता. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार आणि गुणवत्तेनुसार उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे. उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीअंती निवड यादी, प्रतिक्षा यादी, निवडीसाठी नकार दिलेल्या उमेदवारांची यादी, अपात्र उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर उमेदवारांची यादी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या संकेतस्थळावर दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# माचनूरमध्ये संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत, तरुणांना व्यसनमुक्तीचा संदेश; आरक्षणावर ठाम

## एकमेकांमधील वाद टाळा आणि समाज एक संघ ठेवा; मंगळवेढ्यातील माचणूर येथील सभेत आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र श्री माचनूर येथे काल संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे उस्फुर्त आणि जंगी स्वागत करण्यात आले. गावात ठिकठिकाणी फटाक्यांची अवताश बाजी, पुष्पगुच्छ, आणि घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले, मोठ्या संख्येने नागरिक, तरुण वर्ग आणि महिला उपस्थित होत्या, यावेळी आयोजित सभेत बोलताना मनोज दादा जरांगे पाटील यांनी समाज प्रबोधन पर आणि संघटनात्मक मुद्द्यावर भाष्य केले. आपल्या उगवत्या शैलीत त्यांनी तरुणांना स्पष्ट संदेश देत सांगितले की, तरुण मुलांनी व्यसनापासून लांब राहिली पाहिजे, दारूच्या नादात आयुष्य घालवू नका शेतात काम करायला लाज बाळगू नका, व राजखाना बाबतची ही त्यांनी थेट भूमिका मांडत म्हटले राजकारण फक्त पंधरा दिवस करा, निवडणुका संपले की पुन्हा समाजकारण आणि आपल्या कामाकडे वळावं एकमेकांमधील वाद टाळा आणि समाज एक संघ ठेवा.

आपल्या मुलांना अधिकारी बनवा शिक्षण आणि भवितव्यावर बोलताना त्यांनी पालकांना आवाहन केले की आपल्या मुलांना अधिकारी बनवा व शिक्षणावर भर द्या आज आरक्षण नसल्यामुळे स्थित तरुणांची हाल होत आहेत शिक्षण महाग झाले आहे आणि केवळ शेतीच्या उत्पन्नावर शिक्षण भागत नाही आरक्षणाच्या मुद्द्यावर त्यांनी आपली ठाम भूमिका मांडत सांगितले की सोलापूर जिल्ह्यातील ५८ गावे हैदराबाद गॅझेटमध्ये समाविष्ट करण्यात आलेली सूचना करण्यात आली आहेत तसेच सातारा संस्थान मिरज कोल्हापूर आऊजा आधी भागाच्या हैदराबाद संस्थानात समावेश करण्यासाठी उपस समितीकडे प्रस्ताव दिला असले की त्यांनी सांगितली बेंद्रे आडनावाचा विशेष उल्लेख हा या भाषणात त्यांनी भेद्रे या आडनावाच्या विशेष उल्लेख केला व हैदराबाद गॅझेटनुसार त्यांच्याकडे आवश्यक दाखले उपलब्ध आहेत, त्यांच्याकडून संपूर्ण गाव आरक्षणाच्या चौकटीत बसवावे, अशी सूचना त्यांनी केली व त्यामुळे सर्व लेकरा बाळाची कल्याण होईल असेही मनोगत त्यांनी व्यक्त केले सभेच्या शेवटी उप-स्थित त्यांनी त्यांच्या घोषणा नाही परिसर दणाणून सोडला, हो माचनूर मध्ये झालेली ही सभा आगामी काळातील आरक्षणाच्या आंदोलनासाठी महत्वाची ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे

# पंढरपूरला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गेल्या अनेक वर्षापासून पंढरपूरमध्ये अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावे अशी मागणी होत होती. याची देखील घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अपर तहसील कार्यालय मंजूर करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

मंगळवारी देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली या बैठकीमध्ये राज्यात १६ ठिकाणी अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये पंढरपूर व फलटणचा समावेश करण्यात आला आहे. पंढरपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावे असे अनेक वर्षापासून ची मागणी होती. पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिकांना विविध कामासाठी सोलापूरला जावे लागत होते. त्यामुळे त्यांचा वेळ व पैसा वाया जात होता. म्हणून या ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावी अशी मागणी होत होती. अखेर येथील महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री यांनी घेतली आहे. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीर्थक्षेत्र पंढरपूर कडे लक्ष केंद्रित केले आहे. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळावा यासाठी कॉरिडॉर ही करण्यात येणार आहे. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाल्यानंतर कॉरिडोरच्या कामाला गती मिळणार आहे.

# पिंपळगाव (डो) येथे महाशिवरात्री निमित्त सप्ताहाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील पिंपळगाव (डोळा) येथील श्री संतयोगी साधुबुवा महाराज यांच्या पावन भूमीत महाशिवरात्री यात्रे निमित्त सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व संजीवन समाधी सोहळा भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडत आहे.

दि.९ फेब्रुवारी २०२६ पासून या सप्ताहास प्रारंभ झाला असून ह.भ.प.नवनाथ झाडके महाराज (कळंब), ह.भ.प.बापुदेव जोशी महाराज (मोहा), ह.भ.प.अच्युत महाराज आंबिरकर (डिकसळ), ह.भ.प.दत्ता महाराज अंबिरकर (डिकसळ), ह.भ.प. माऊली महाराज जगताप (पालसिंगन), ह.भ.प आप्पा महाराज जावळे हाळदगाव, ह.भ.प.बाळासाहेब बोधले महाराज डिकसळ, ह.भ.प.श्रीनिवास जगताप महाराज पालसिंगन हे अमृततुल्य कीर्तन करणार आहेत. या धार्मिक सोहळ्याला परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असुन सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी दि.११ फेब्रुवारी २०२६ बुधवार रोजी सायंकाळी स्मृतीशेष बगडाबाई दशरथ घोडके यांच्या स्मरणार्थ सुभाष घोडके यांच्या वतीने भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली होती. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ व भक्त उपस्थित होते.

या वेळी रात्री ९ वाजता ह.भ.प.अच्युत महाराज आंबीरकर (डिकसळकर) यांचे अमृततुल्य कीर्तन संपन्न झाले. आपल्या ओजस्वी वाणीतून त्यांनी संतांच्या जीवनातील त्याग, साधना आणि समाजसेवेचा आदर्श मांडताना भगवंताचे गुण संतांमध्ये दिसतातअसे प्रतिपादन केले. संत हे ईश्वराचे साक्षात स्वरूप असून त्यांच्या सहवासातून समाजात सद्भावना, नैतिकता आणि अध्यात्मिक जागृती निर्माण होते,असे त्यांनी स्पष्ट केले. कीर्तनादरम्यान भाविक मंत्रमुग्ध झाले होते.

### भगवंताचे गुण संतांमध्ये दिसतात : ह.भ.प.अच्युत आंबीरकर महाराज

या कार्यक्रमास माजी सरपंच सुखदेव टेकाळे, विविध विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन सतीश टेकाळे, प्रकाश भंडगे,ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपूत,बाळासाहेब पवार,मधुकर बारगुले, अंकुश पांचाळ,अशोक साखरे,तुकाराम दत्त, सहशिक्षक सोमनाथ गुजर,बापूराव गुजर, लक्ष्मण घोडके,ग्यानदेव टेकाळे,भागवत सोमसे, रामदास टेकाळे,संजय स्वामी,राजेंद्र बारगुले, अविनाश घोडके, सागर घोडके यांच्यासह ग्रामस्थ ल भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सप्ताहाच्या निमित्ताने दररोज पहाटे काकडा आरती,दिवसभर हरिनाम संकीर्तन,ज्ञानेश्वरी पारायण तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून मंदिर परिसरात श्रद्धाळूंची सतत वर्दळ सुरू आहे.

या कीर्तनसेवा व महाप्रसाद सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल साधुबुवा मंदिर विश्वस्त मंडळ समितीचे अध्यक्ष नारायण (आप्पा) दशवंत यांनी सर्व भाविकांचे आभार मानले. महाशिवरात्री यात्रोत्सवाच्या निमित्ताने पुढील दिवसांमध्येही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.



# कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयातील कॉपीमुक्त परीक्षा यंत्रणा कौतुकास्पद : प्रशांत आरबाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १२ वी परीक्षा केंद्रातील परीक्षा यंत्रणा अतिशय कार्यक्षम असल्यामुळे परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात सुरू असून विद्यालयाची ही कामगिरी कौतुकास्पद आहे, परीक्षा केंद्राच्या परिसरात कमालीची शांतता असून आम्ही तर गुरुकुलाची शांतता येथे अनुभवली असे मत गट शिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी व्यक्त केले.

सध्या बारावीच्या परीक्षा सुरू आहेत, त्यानिमित्त महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयात इ १२ वी मराठी विषयाच्या पेपर दिवशी अचानक भेट देऊन प्रत्यक्ष परीक्षा हॉलमध्ये जाऊन त्यांनी परीक्षा पद्धतीची पाहणी केली, त्यानंतर पर्यवेक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्रप्रमुख मलकप्पा भरमशेट्टी व प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे उपस्थित होते.

### परीक्षा केंद्राची तपासणी अनुभवली गुरुकुलातील शांतता

पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यालयाने परीक्षा कॉपीमुक्त, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी परिसर व प्रत्येक वर्ग खोलीत सी सी कॅमेरे बसवलेले आहेत सर्व विद्यार्थी नियमांचे पालन करून एकाग्रतेने प्रश्नपत्रिका सोडवत असल्याचे चित्र दिसून आले . पर्यवेक्षक आणि शिक्षक सतत लक्ष ठेवून परीक्षा सुरळीत पार पडण्यासाठी सहकार्याची भूमिका पार पाडत आहेत. शांत आणि सुरक्षित वातावरणामुळे विद्यार्थी निर्धास्तपणे आपले ज्ञान प्रदर्शित करताना दिसले, त्यामुळे आपण समाधानी आहोत अशी प्रतिक्रिया गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांनी व्यक्त केली. यावेळी बैठे पथक म्हणून विषय तज्ञ श्री गोविंद राठोड, श्री शंकर आजगोंडा तसेच भरारी पथकातील केंद्रप्रमुख वीरेंद्र गजा हे उपस्थित होते.

### परीक्षेसाठी शिक्षकांची यंत्रणा

**परीक्षा व्यवस्थित, सुरळीत आणि यशस्वीपणे पार पडाव्यात म्हणून शिक्षकांची यंत्रणा सज्ज करण्यात आली असून अनुचित प्रकार घडणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात आली असल्याचे यावेळी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी सांगितले.**

# बार्टीचे काम प्रशंसनीय




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : दिनांक १२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेचे विविध क्षेत्रातील कार्य अत्यंत प्रशंसनीय असून संस्था योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन अनुसूचित जाती -जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांनी व्यक्त केले. ते बार्टीच्या आढावा बैठकीत बोलत होते.

आज बार्टी मुख्यालयात त्यांनी संस्थेच्या अनेक योजनांची माहिती घेतली. बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी बार्टी राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांना दिली. यावेळी निबंधक विशाल लोंढे, विभागप्रमुख रवींद्र कदम,डॉ. बबन जोगदंड, शुभांगी लेखाधिकारी नितीन चव्हाण, प्रज्ञा मोहिते,सुमेध थोरात, डॉ.सारिका थोरात, महेश गवई, आरती जाधव, यांची उपस्थिती होती.

यावेळी अडसूळ यांनी उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांना मार्गदर्शनही केले. यावेळी ते म्हणाले,आपला देश प्रजासत्ताक झाल्यानंतर देश कसा चालवायचा ? याविषयी मंथन सुरू होते. परंतु ४० कोटीच्या देशात संविधान लिहिण्यासाठी कोणीही विद्वान नव्हता . डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी परदेशात उच्च शिक्षण घेतले. ते वकील, बॅरिस्टर प्रोफेसर झाले व त्यांनी जगातील सर्व राज्यघटनेचा अभ्यास करून आपल्याला संविधान दिले. ते कायदे पंडित होते. त्यांनी दिलेल्या संविधानामुळेच आज माझ्यासारखा सामान्य माणूस खासदार ,अनुसूचित जाती जमाती आयोगाचा अध्यक्ष होऊ शकला.जर बाबासाहेब जन्माला आले नसते तर मी ,तुम्ही , आपण कुठे असतो. आपण बाबासाहेबा मुळेच त्यांनी दिलेल्या संविधानामुळेच आज सन्मानाचे जीवन जगत असल्याचे गौरवोद्गार काढले. प्रारंभी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस त्यांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

### एससी, एसटी कमिशनचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांचे प्रतिपादन

बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, महामानव ग्रंथ, भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

आढावा बैठकीत बोलताना आडसूळ यांनी बार्टीच्या विविध योजना तळागाळातील अनुसूचित जातीतील वंचित घटकापर्यंत पोहोचण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक गतीने काम करावे,असे निर्देश दिले.

बार्टी अनुसूचित जातीच्या उत्थानासाठी चांगले काम करत असून आपली मुले प्रशासकीय सेवेत अधिकारी, व उद्योजक होण्यासाठी त्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी बार्टीने काम करावे, असे आवाहनही केले.

मा महासंचालक वारे यांनी बार्टी संस्थेची स्थापना , कामकाज , कार्यक्षेत्र,तसेच बार्टीमुळे आपले अनेक विद्यार्थी भरतीय नागरी सेवेत तसेच राज्य सेवेत अधिकारी म्हणून काम करत आहेत.तसेच अनेक संशोधक विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन क्षेत्रात बार्टीचे नाव कोरले आहे. अनेक मुलांना रोजगार उपलब्ध झाला असून संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर व अन्य महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच बार्टी महापुरुषांच्या समतेच्या विचाराचा प्रसार-प्रचार करत असल्याचे सांगितले.

सूत्रसंचलन नितिन सहारे यांनी तर आभार डॉ बबन जोगदंड यांनी मानले.

**स्वेरीत डॉ. सचिन गवळी यांना वाहिली श्रद्धांजली**

# डॉ. सचिन गवळी सर हे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते : प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : 'कोणतेही शैक्षणिक कार्य असो अथवा सामाजिक उपक्रम असो, ते स्विकारण्यासाठी व यशस्वीरित्या पूर्ण करण्यात कै. डॉ. सचिन गवळी हे अग्रेसर असत. शिक्षण क्षेत्रातील नवनवीन गोष्टी आत्मसात करण्याची त्यांची तळमळ वाखाणण्यासारखी होती. कॉलेजमध्ये प्रवेश केल्यापासून संध्याकाळी घरी जाईपर्यंत विद्यार्थ्यांच्या गोतावळ्यात ते राहायचे. विद्यार्थ्यांना कोणती अडचण असेल तर ते अखेरपर्यंत पाठपुरावा करून प्रश्न सोडवायचे. त्यांच्या कामाची पद्धत ही अनुकरणीय होती. एकूणच कै. डॉ.सचिन गवळी सर हे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते.' असे प्रतिपादन गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले.

स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.सचिन रामचंद्र गवळी यांचे काल रात्री अकस्मात निधन झाले. या निमित्ताने स्वेरीमध्ये शोकसभेचे आयोजन केले होते. यावेळी संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे हे डॉ. गवळी सरांच्या कार्यावर प्रकाश टाकत होते. कै. डॉ.सचिन गवळी यांच्या प्रतिमा पुजनानंतर डॉ. यशपाल खेडकर यांनी कै. डॉ. गवळी यांच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. तंत्रशिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. एन. बी. पासलकर म्हणाले की 'डॉ. गवळी सर सदा हसतमुख असायचे, समाधानाने कार्य करायचे, आपल्या कार्यात ते मग्न असायचे कोणतीही जबाबदारी ते उत्तमरीत्या सांभाळायचे. त्याचबरोबर आयआयसी मेंबर सुहास देशपांडे, स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, कै. डॉ.सचिन गवळी सरांचे पीएच.डी. शिक्षण घेताना मार्गदर्शक असलेले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ. डी.ए. तंबोळी, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले, विद्यार्थी सूरज लंगोटे, विद्यार्थिनी गौरी महाजन व सिद्धी भोसले यांनी देखील सहवेदना व्यक्त केल्या. डॉ. यशपाल खेडकर हे कै. डॉ.सचिन गवळी यांच्या जीवनावर भाष्य करताना म्हणाले की, 'आदर्श गुरु, उत्कृष्ट प्रशासक, विद्यार्थीप्रिय सच्चा शिक्षक, संयमी मार्गदर्शक, उमदा माणूस, कुटुंबवत्सल पिता, पुत्र आणि ज्येष्ठ बंधुसम आधार हरपला.' असे सांगून श्रद्धांजली वाहिली. यावेळी स्वेरी अंतर्गत असलेल्या बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.